**क्रमांक : १६**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ / फल्गुन १०, १९४२ (शके)**

**१६. मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला सुधारणा :**

"विधानसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात मंगळवार, दिनांक २ मार्च व बुधवार, दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी घेण्याचे प्रस्तावित आहे. मा.राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास एका सदस्यास दहापेक्षा अधिक सुधारणा देता येत नाहीत अशी तरतूद म.वि.स. नियम ६१ मध्ये करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सर्व विधानसभा सदस्यांना असे कळविण्यात येते की, **ज्या सदस्यांना आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा द्यावयाच्या असतील त्यांनी सुधारणांच्या सूचना तीन प्रतींमध्ये 'अ' कक्ष, कक्ष क्रमांक ११०३, अकरावा मजला, विधानभवन, मुंबई येथे किंवा a1.assembly.mls@gmail.com या ई-मेलवर (DVOT-Surekh या Font मध्ये) सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील या बेताने पाठवाव्यात.**

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : १ मार्च, २०२१

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

<u>**याची प्रत :-**</u>

१) महाराष्ट्र विधानसभेचे सन्माननीय सदस्य.

२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी व कक्ष.

३) संगणक कक्ष (Website)